भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०७/२०१७

**१) संगनमत करुन महिलेस अश्लिल शब्दात जीवाचक शिवीगाळ व मारहान केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ११/०७/२०१७ चे ०८.०० ते ०९.०० वा. दर. यातील फिर्यादीचे मालकीचे गट क्र. ११६ मध्ये शेतीचे कामाने गेली असता त्यावेळी यातील आरोपी हे तेथे रावणी करीत असल्याचे दिसल्याने त्यांना मनाई केली असता आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादीस गोंडीन असे जाती वाचक बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारहान करुन धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३(१)आर/५अ.जा.ज.अ.प्र.का सहकलम २९४,५०६,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर श्री. विक्रम साळी हे करीत आहेत.

**२) शेतातील विहीरीवर लावलेला मोटार पंप ला लावलेला प्लॅस्टीक रोल पाईपची चोरी . :-**

दिनांक ०९/०७/२०१७ चे १६.३० ते ११/०७/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी निलेश भुईचंद सावरबांधे वय ३० वर्ष, रा. धामनी यानी आपले शेतातील धानाच्या पऱ्यांना पाणी देण्याकरीता काकाचे शेतातील विहीरी वरुन मोटार पंप ला लावले असलेला एकुण ३०० फुट लांबीचा काळया रंगाचा १ प्लॅस्टीक रोल पाईप किंमती १५,०००/-रु. चा कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) चारचाकी वाहनाची मोटार सायकला धडक देवुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ११/०७/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी अश्विनकुमार राजु बडोले वय २३ वर्ष, रा. सिव्हील वार्ड साकोली हा मोटार सायकल क्र. एम. एच ३१/डीएम २२१२ नी मित्रा सोबत एकोडी फाटा एन.एच. ६ रोड ओलांडुन घराकडे जात असता यातील आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन सेंदुरवाफा कडुन साकोली कडे हयगयीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला एकोडी फाटा येथे धडक मारुन फिर्यादीस व मागे बसलेला त्याचा मित्र विशाल बडोले यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता तसेच वैदयकीय उपचाराला न नेता पळुन गेल्याचे फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४,१८७(अ)(ब) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) धरणसिंचन विहीरीचे प्रलबिंत असलेल्या बिलाचे एमबी बुक तयार करण्याकरीता तक्रारी पडताळणी कार्यवाहीवेळी प्रत्यक्ष लाच रक्कम स्विकारतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ११/०७/२०१७ चे १३.२४ वा. दर. यातील आरोपीने तक्रारी उमेश पोहनकर यांना शासनाकडुन धरणसिंचन विहीर कार्यक्रमाअंतर्गत मंजुर झालेल्या सिंचन विहीरीचे तक्रारी व त्याचा मित्र गोटेफोडे या दोघांचे विहीरीचे प्रलंबित असलेल्या बिलाचे एमबी बुक तयार करण्याकरण्याकरीता तक्रारी पडताळणी कार्यवाहीवेळी २०००/-रु. व त्याचे मित्र गोटेफोडे यांचे ५०००/-रु. असे एकुण ७०००/-रु. लाचेची मागणी करुन प्रत्यक्ष सापडा कार्यवाही वेळी ७०००/-रु. लाच रक्कम स्विकारतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी दिनकर चंद्रभान सावरकर उपधिक्षक ला.प्र.का.विभाग भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ७,१३(१)(५)ला.प्र.का सहकलम १३(२)ला.प्र.का १९८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सावरकर एसीबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—

दिनांक १०/०७/२०१७ चे १२.१० वा. दर. यातील मृतक सौ. मंजु विजय वासनिक वय २७ वर्ष, हसारा टोली ने विषारी औषध प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता सु. बो दवाखाना तुमसर येथे भरती केले असता प्राथमीक उपचार करुन एम. ओ. सा. यांनी पुढील उपचाराकामी सा.रु.भंडारा येथे रेफर केल्याने सा. रु.भंडारा येथे आ.सी.यु मध्ये भरती असतांना उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे भंडारा मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे पोहवा. ठाकरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) अचानक प्रकृती बिघडल्याने तरुणीचा मृत्यु . :—

दिनांक ११/०७/२०१७ चे ००४५ वा. ते ०१.३० दर. यातील मृतक कांचन जगन चुटे वय २७ वर्ष, रा. खुनारी हिची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीत ग्रा. रु. पालांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने मा. वैदयकीय अधिकारी यांचे लेखी मेमो वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. वासनिक पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

७) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—

अ) दिनांक ११/०७/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील टाटा मॅजीक गाडी क्र. २९ आर ५७५३ ही आमरोडवर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

ब) दिनांक ११/०७/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील मारोती व्हॅन क्र. ३१ एच ९२९० ही आमरोडवर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ११/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५ तीन सिटर वाहनांवरती २४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४६ केसेस करण्यात आलेल्या आहेत



सपोनी. पी. के. बोरकुटे
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९६५७४०७१७३

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.